**क्रमांक : २४२८६/ ई-१**

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई
दिनांक : ६ डिसेंबर, २०२२

# <u>: परिपत्रक :</u>

**विषय : महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सदस्यत्वाची मुदत दिनांक ५ डिसेंबर, २०२२ रोजी समाप्त झाल्यामुळे मा.सदस्यांकडून आगामी सत्राकरिता प्राप्त झालेल्या तारांकित प्रश्न सूचनांवरील कार्यवाहीबाबत.**

महाराष्ट्र विधानपरिषदेतील सर्वश्री.चंदुभाई पटेल, मोहनराव कदम, अमरनाथ राजूरकर, दुष्यंत चतुर्वेदी, अनिल भोसले व डॉ.परिणय फुके, वि.प.स. अशा एकूण ६ सन्माननीय सदस्यांच्या सदस्यत्वाची मुदत दिनांक ५ डिसेंबर, २०२२ रोजी समाप्त झाली आहे. सदर सन्माननीय सदस्यांपैकी डॉ.परिणय फुके, वि.प.स. यांचेकडून आगामी सत्राकरिता केवळ पहिल्या टप्प्यातील तारांकित प्रश्न सूचना प्राप्त झाल्या आहेत.

डॉ. परिणय फुके, वि.प.स. यांची सदस्यत्वाची मुदत दिनांक ५ डिसेंबर, २०२२ रोजी समाप्त झाली असल्याने त्यांचेकडून पहिल्या टप्प्यातील प्राप्त झालेल्या तारांकित प्रश्न सूचनांवरील कार्यवाही आहे त्या स्तरावर थांबविण्यात येऊन उक्त सूचना व्यपगत समजण्यात याव्यात.

**(राजेश तारवी)**
उप सचिव
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रती :**

(१) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव
(२) मा. उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव
(३) मा.मंत्री व मा.राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव
(४) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी तथा कार्यवाहीसाठी अग्रेषित.